# प्रेस नोट

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून व जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक :- ०८/११/२०१७

भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे किरण शिवाजी डोळे, वय २४ वर्षे, रा. जुनी दुग्गड चाळ, रुम नं. ११५, आयप्पा मंदिरासमोर, संतोषनगर, कात्रज पुणे यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ४४/२०१७ दिनांक ०८/११/२०१७ रोजी दोन वर्षाकरीता पुणे शहर व पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. त्याचे विरुध्द जबरी चोरी, शिवीगाळ करुन हाताने मारहाण करणे, धमकी देणे, नुकसान करणे, सामाईक इरादा, दरोडा तयारी, अवैधरित्या शस्त्र जवळ बाळगणे, जखमी करणे, सरकारी नोकरास जखमी करणे, दारु पिवून सार्वजनिक ठिकाणी गोंधळ करणे या सदराखाली वरील प्रमाणे भारती विद्यापीठ पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल आहेत. त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास डॉ. प्रविण मुंढे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर व पुणे जिल्ह्यातुन दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.